# ग्रामपंचायत जांभुळ, ता.मावळ जि.पुणे

**ई-निविदा अंतर्गत खुलीनिविदा सुचना बी.-१ निविदासुचना क्र.०१,सन २०२५-२६.**

ग्रामपंचायत जांभुळ, ता.मावळ, जि.पुणे यांचेतर्फे खालीलप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडील फ़क्त **योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार, साहित्य व सेवा पुरवठादार यांजकडुन** दोन लिफ़ाफ़ा पद्धतीने खालील कामांच्या ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| निविदा सांकेतांक क्रमांक | कामाचे नाव | इसारा रक्कम रू. | निविदा फ़ी. रू. | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ६ |
| GP Jambhul - 2026-27-01 | मौजे जांभुळ ग्रा.पं. कार्यालयासाठी फर्निचर साहित्य पुरवठा व देखभाल दुरुस्ती करणे. ता.मावळ. | ५,०००/- | ५९०/- | ०६ महिने |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे**

१. सदर संपुर्ण निविदा प्रक्रीया ई-निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा नोटीस प्रसिध्दी, सुचना, शुद्धीपत्रके इत्यादीची माहीती **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. वरील कामाचे निविदा प्रपत्रे **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. सदर निविदा प्रपत्रे, अटी, शर्ती, इ. सदर संकेतस्थळावर दि.१४/०५/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेपासुन ते दि.२१/०५/२०२६ चे ०५.०० वाजेपर्यंत अधिगृहीत (Download) करता येतील.

३. वरील कामाच्या निविदा **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दि. १४/०५/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेपासुन ते दि.२१/०५/२०२६ चे ०५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पद्धतीने सादर करता येतील.

**१) निविदा भरण्याची कार्यपद्धती – कागदपत्रांच्या मुळ प्रती स्कॅन करून अपलोड कराव्यात**

अ) प्रत्येक कामाचे निविदा प्रपत्र डाऊनलोड केल्याची निविदा फ़ी, व बयाणा/इसारा रक्कम निविदा सुचना रकाना क्रमांक ४ व ५ नुसारच्या रक्कमेनुसार ग्रामपंचायतच्या खातेवरती ऑनलाईन पद्धतीने (As per online procedure) भरणे आवश्यक आहे..

ब) **नोंदणी प्रमाणपत्र (फ़ोटोसहीत)** , शॉपACT व प्राप्तीकर, पॅनकार्ड स्कॅन करून pdf. मध्ये सुस्पष्ट अपलोड करावे लागेल.

क) विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (Declaration of Contractor) सही शिक्क्यानिशी स्कॅन करून pdf. मध्ये अपलोड करावे लागेल.

ख) मागील ३ वर्षाचे आयकर भरल्याचे प्रमाणपत्र व GST प्रमाणपत्राची प्रत असणे बंधनकारक राहील.

ग) भागीदारी संस्था असल्यास भागीदारी करारनामा तसेच आवश्यकतेनुसार पॉवर ऑफ़ अटर्नी जोडावी.

घ) PTR(I), PTE(II) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र स्कॅन करून जोडणे आवश्यक आहे.

ङ) **कागदपत्रांच्या मुळ प्रती स्कॅन करून अपलोड कराव्यात, सत्यप्रत किंवा साक्षांकित प्रत ग्राह्य धरली जाणार नाही. मुळप्रति अपलोड केलेल्या नसल्यास निविदा अवैध ठरविण्यात येईल व लिफ़ाफ़ा क्र.२ (आर्थिक लिफ़ाफ़ा) उघडणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.** तसेच कोणतीही कागदपत्रे अपलोड करण्यास वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

**ब) व्यापारी लिफ़ाफ़ा –**

**१. निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा अधिक दराने कमी असेल तर एवढ्या कमी दरात कामाचा दर्जा योग्य राखुन काम कसे पुर्ण याबाबतचा सविस्तर लेखी तपशील स्वाक्षरीसह लिफ़ाफ़ा क्र.२ मध्ये विहीत ठिकाणी स्कॅन करून सादर करावा अन्यथा निविदा अवैध समजण्यात येईल.**

२. **निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दरांचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किंमतीच्या १% एवढ्या किमतीची बॅंकेची प्रतीपुर्ती हमी परफ़ॉर्मन्स सिक्युरिटी म्हणुन निविदेच्या लिफ़ाफ़ा क्र.२ मध्ये सादर करावी.(तसेच Scan करून ई-निविदेसोबत सादर करावी.) बॅंक प्रतिभुती हमी प्रशासक, "ग्रामपंचायत जांभुळ " च्या नावे असावी. (उदा.१% ते १०% कमी दर - १% रक्कम)**

३. **निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढ्या जास्त दराने आहे तेवढ्या रकमेचा व वरील बाब-४ प्रमाणे बॅंकेची प्रतिपूर्ती हमी निविदेसोबत लिफ़ाफ़ा क्र.२ मध्ये सादर करावी.**(उदा.१४.००% कमी दर :- १०% पर्यंत करिता १% व (१४% - १०%) ४% असे एकूण ५%) ही रक्कम रूपये १०००/- पेक्षा कमी असल्यास किमान रूपये १०००/- ची बॅंकेची प्रतिपूर्ती हमी सादर करणे अनिवार्य राहील नसलेस निविदा अवैध ठरविणेत येईल.

४. **बॅंक प्रतिभुती हमी सरकारी/शेड्युल्ड तसेच सार्वजनिक क्षेत्रातील बॅंकेची असावी. बॅंक प्रतिभूती हमीची मुदत कामाच्या दोषदायित्व कालावधीनंतर एक महिना कालावधीपर्यंत असावी.**

५. **कंत्राटदाराने अंदाजपत्रकीय दराच्या १०% पेक्षा कमी दर भरल्यास अतिरिक्त इसारा रक्कम / कामगिरी सुरक्षा ठेव रक्कमेची बॅंक प्रतिभुती हमी सादर केल्यास अथवा आवश्यक बॅंक प्रतिभुती हमी सादरच न केल्यास सदर कंत्राटदाराची निविदा रद्द करण्यात येईल.**

६. ई-निविदेसोबत जोडलेल्या BOQ File मध्ये निविदा धारकाचे नांव व दर नमुद करावा.

७. आर्थिक लिफ़ाफ़ा उघडलेनंतर फ़क्त जो निविदाधारक लघुत्तम निविदाधारक ठरेल त्याने सदर अपलोड केलेला मुळ बॅंक प्रतिभुती हमी कार्यालयास तात्काळ जमा करावयाचा आहे. तसेच लघुत्तम निविदाधारकाने मुळ बॅंक प्रतिभुती हमी ८ दिवसांचे आत कार्यालयास जमा न केलेस बयाणा (EMD) जप्त/ वसुल करून त्यास ग्रामपंचायत जांभुळ काळ्या यादीत समाविष्ट करणेत येईल. व जि.प.पुणे यांच्या काळ्या यादीत समाविष्ट करणेस शिफ़ारस करणेत येईल.

८. निविदा प्रपत्रातील सविस्तर निविदा नोटीस मधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारांवर बंधनकारक राहतील. ऑनलाईन पद्धतीने सादर केलेला लिफ़ाफ़ा क्र.१ (तांत्रिक लिफ़ाफ़ा) **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर शक्यतो दि.२२/०५/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता ग्रामपंचायत जांभुळ कार्यालयात उघडणेत येईल.

९. पात्र निविदा धारकांचा दराचा लिफ़ाफ़ा क्रमांक २ उघडणेचा दिनांक व वेळ संबंधित ठेकेदारांस e-mail द्वारे कळविण्यात येईल.

१०. मंजुर निविदा धारकाकडुन विहित सुरक्षा अनामत रक्कम ही कामाचा करारनामा करतेवेळी ग्रामपंचायत जांभुळ, ता.मावळ, यांचे नावे असलेल्या ठेव पावती स्वरूपात/ चलनाने रोख स्वरूपात घेतली जाईल व उर्वरीत अनामत रक्कम देयकातुन कपात केली जाईल.

११. निविदेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सुचना, शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

१२. कामासंबंधीचे सविस्तर आराखडे/नकाशे इत्यादी कार्यालयीन वेळेत निविदा कालावधीमध्ये निम्न स्वाक्षरीस्तांचे कार्यालयात विनामुल्य पहावयास मिळतील.

१३. कोणतेही कारण न देता निविदा अथवा सर्वच निविदा नाकारणेचा किंवा रद्द करणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखुन ठेवला असुन निविदा भरणा-या ठेकेदाराला निविदा फ़ेटाळल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

१४. निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यांवर कागदपत्राच्या विधीग्राह्यतेबाबत आक्षेप नोंदविला गेल्यास सदरची बाब कायदेशीर / फ़ौजदारी कार्यवाहीस पात्र राहील.

१५. निविदा प्रक्रिया संपुर्ण संगणकीकृत असलेने ई-प्रणाली द्वारे निविदा उघडलेचा मेसेज ऑनलाईन येतो, तो पाहण्याची जबाबदारी निविदाधारकाची असुन त्याबाबत स्वतंत्र कोणताही पत्रव्यवहार अथवा भ्रमणध्वनीद्वारे कळविले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-XXX
ग्रामविकास आधिकारी ,
ग्रामपंचायत जांभुळ ता.मावळ,जि.पुणे.

सही/-XXX
प्रशासक
ग्रामपंचायत जांभुळ ता.मावळ, जि.पुणे.

Signature Not Verified
Digitally signed by SHUBHANGI NAVNATH BHUMKAR
Date: 2026.05.14 15:23:55 IST
Location: Maharashtra-MH